


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २८६ • बुधवार दि.१२ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## मुंबईत दरड कोसळली सहा जणांचा मृत्यू

### ९ तासांनंतरही बचावकार्य सुरुच;मृतांचा आकडा वाढण्याची भिती



मुंबई/प्रतिनिधी-मुंबईतील घाटकोपर पूर्वेकडील अशोक नगर परिसरातील गौसिया चाळीवर पहाटेच्या सुमारास दरडीचा मोठा भाग कोसळून भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेत आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला असून, मृतांमध्ये एका चिमुकल्याचाही समावेश आहे. दुर्घटनेनंतर अग्निशमन दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), मुंबई पोलीस आणि महापालिका प्रशासनाच्या पथकांकडून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे.

पहाटे तीन ते चार वाजण्याच्या सुमारास नागरिक गाढ झोपेत असताना डोंगराचा कडा अचानक गौसिया चाळीतील दोन ते तीन घरांवर कोसळला. काही क्षणांतच घरांचा ढिगारा झाला आणि त्याखाली नागरिक अडकले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, एनडीआरएफ, पोलीस आणि महापालिकेची पथके घटनास्थळी दाखल झाली. बचाव पथकांनी ढिगारा हटवून नागरिकांचा शोध घेण्यास सुरुवात केली. सकाळी सुरुवातीला दोन जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. त्यानंतर सकाळी दहा वाजेपर्यंत आणखी चार मृतदेह हाती लागले. मृतांमध्ये लहान मुलाचाही समावेश असल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृतांपैकी काही जण एकाच कुटुंबातील असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरडीचा मोठा भाग घरांवर कोसळल्याने ढिगारा हटविण्याचे काम अत्यंत आव्हानात्मक पान ४ वर

## निवडणूक आयोगाची भूमिका संशयास्पद;लेखी पुरावा सादर

### शिवसेना कोणाची?,सुप्रिम कोर्टात सिब्बल यांचा युक्तिवाद

नवी दिल्ली:शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या अंतिम सुनावणीत ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी २०१८ मधील पक्षघटनेशी संबंधित लिखित पुरावे सादर करत निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. ४ एप्रिल २०१८ रोजीचे कागदपत्र आणि त्यावरील आयोगाचा शिक्का न्यायालयाच्या निदर्शनास आणून देत, संबंधित कागदपत्र आयोगाकडे सादर झाले होते, असा दावा सिब्बल यांनी केला.



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश आणि न्यायमूर्ती जे. बागची यांच्या खंडपीठासमोर सिब्बल यांनी आजही आपला युक्तिवाद पुढे सुरू ठेवला. लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम २९-एचा संदर्भ देताना सिब्बल म्हणाले की, पक्षाच्या नावात, मुख्यालयात, पदाधिकाऱ्यांमध्ये किंवा पत्त्यात बदल झाल्यास त्याची माहिती आयोगाला देणे आवश्यक असते. शिवसेनेने पदाधिकाऱ्यांची माहिती तसेच पक्षाची घटना आयोगाकडे सादर केली होती. त्यामुळे २०१८ ची पक्षघटना आयोगाला माहिती नव्हती, असे म्हणणे योग्य नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. कृपया ४ एप्रिलची तारीख आणि आयोगाचा शिक्का पाहा. हे कागदपत्र थेट उपनिवडणूक आयुक्तांकडे सादर करण्यात आले होते. २०१८ मध्ये मी बनावट दस्तऐवज तयार केला असण्याची शक्यता नाही. जर हे कागदपत्र नंतर तयार केले असेल, तर आयोगाने त्यावर कारवाई करायला हवी होती, असा सवाल सिब्बल यांनी केला.शिवसेनेतील उपनेत्यांबाबतही आयोगाने चुकीचा निष्कर्ष काढल्याचा दावा त्यांनी केला. १२ उपनेते नामनिर्देशित, तर २१ उपनेते निवडून आले होते, अशी माहिती आयोगाला देण्यात आली होती. २०१८ ची पक्षघटना लोकशाहीवादी असून पक्षप्रमुखाची निवडणुकीद्वारे निवड होते, असेही सिब्बल यांनी न्यायालयात स्पष्ट केले.निवडणूक पान ४ वर

## सर्वेक्षणाचा दावा;एनडीएला २४०, इंडियाला २८० जागांचा अंदाज

### मोदी-शहांना निवडणुकीत धक्का;मूड ऑफ इंडिया सर्वेक्षण

नवी दिल्ली:देशात आज लोकसभेची निवडणूक झाल्यास भाजपप्रणित एनडीएला मोठा फटका बसू शकतो, असा दावा पोल ट्रॅकरच्या मूड ऑफ इंडिया सर्वेक्षणातून करण्यात आला आहे. सर्वेक्षणानुसार, इंडिया आघाडीला ४४ टक्के मते आणि २८० जागा, तर एनडीएला ४० टक्के मते आणि २४० जागा मिळण्याचा अंदाज आहे. इतर पक्षांना १६ टक्के मते व २३ जागा मिळू शकतात.

३ जुलै ते ७ ऑगस्टदरम्यान ५४३ लोकसभा मतदारसंघांत हे सर्वेक्षण झाल्याचा दावा असून, ४ लाख ५३ हजार जणांचा सहभाग असल्याचे सांगण्यात आले आहे.सर्वेक्षणात राहुल गांधी यांना पुढील पंतप्रधान म्हणून ५८ टक्के पसंती मिळाल्याचा दावा आहे. मोदींच्या कामावर ४३ टक्के नागरिक समाधानी, तर ४७ टक्के असमाधानी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरुणांच्या भविष्यासाठी राहुल गांधींना ६९ टक्के, तर नरेंद्र मोदींना २३ टक्के पसंती मिळाल्याचे सर्वेक्षणात म्हटले आहे.दरम्यान, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सर्वेक्षणाचा व्हिडीओ शेअर करत, मोदी-शहा जायेंगे! जरूर जायेंगे! असे म्हणत भाजपवर निशाणा साधला आहे. या सर्वेक्षणाची स्वतंत्र अधिकृत पुष्टी मात्र झालेली नाही.

## इंदरजितसिंघ बावरी खून प्रकरणी आणखी एका आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-सिडको भागातील धनेगाव पेट्रोल पंपाजवळ दि.८ ऑगस्ट रोजी पूर्ववैमनस्यातून बिगानिया टोळीतील काही गुंडांनी इंदरजितसिंघ बलजितसिंघ बावरी या तरुणाची हत्या केली होती. या घटनेतील पाच आरोपींना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी अटक केली होती. आणखी एका आरोपीस मंगळवारी गोवर्धनघाट भागातून पोलीसांनी अटक केली आहे.

इंदरजितसिंघ बावरी याच्या हत्या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात बिगानिया टोळीतील गुंडांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी पाच जणांना अटक केली. या घटनेतील एक आरोपी गोवर्धनघाट परिसरात असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली



फौजदार साईनाथ पुयड व पोलीस कर्मचाऱ्यांनी गोवर्धनघाट भागात सापळा रचून अजय उर्फ अज्जू महिंद्र बिगानिया (वय ३२)रा. वाल्मिकीनगर, देगलूर नाका,नांदेड यास अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींची संख्या सहा झाली असून या गुन्ह्यातील आणखी काही आरोपी सध्या फरार आहेत.



पोलीस अधीक्षक डॉ.नीलभ रोहन यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी रात्री नांदेड शहरात कोंम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले. या ऑपरेशनमध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. पोलीसांनी या ऑपरेशन अंतर्गत गस्त करुन रेकॉर्डवरील व जामीनावर सुटलेल्या गुन्हेगारांची तपासणी केली.

## परीक्षांतील गैरप्रकारांना लगाम; केंद्राचा कठोर कायदा महाराष्ट्रात लागू

मुंबई/प्रतिनिधी-पेपरफुटी व परीक्षा गैरव्यवहार रोखण्यासाठी केंद्र सरकारने केलेला कठोर कायदा महाराष्ट्रात लागू करण्याची प्रक्रिया येत्या पंधरवड्यात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच राज्यातील परीक्षा पद्धतीत सर्वंकष सुधारणा करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा समावेश आहे.समिती प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक व संबंधित घटकांशी संवाद साधून त्यांच्या सूचना घेणार असून त्याआधारे राज्यासाठी परीक्षा सुधारणा धोरण निश्चित केले जाणार आहे. राज्यात किमान २५ हजार सुरक्षित वर्गखोल्या उभारण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

## स.सुखबीरसिंघ बादल यांचा तीन दिवसीय नांदेड दौरा

नांदेड/प्रतिनिधी-शिरोमणी अकाली दल बादल पक्षाचे सर्वेसर्वा व पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री स.सुखबीरसिंघ बादल हे बुधवार, दि.१२ ऑगस्ट पासून तीन दिवस नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.



बुधवार दि.१२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता दरम्यान श्री गुरु गोबिंदसिंघजी विमानतळात त्यांचे आगमन होणार आहे. त्यांचा दौरा गुरुद्वारा दर्शन आणि स्थानीक लोकांच्या भेटीसाठी असल्याचे सांगितले जात आहे. गुरुवार दि.१३ रोजी दिवसभर त्यांचा नांदेड़मध्ये मुक्कामी राहणार आहेत. तसेच शुक्रवारी सकाळी ते पंजाबकडे प्रस्थान करतील. सुखबीर सिंघ बादल यांच्या दौरा कार्यक्रमावर पंजाब येथील राजकीय क्षेत्राचे ध्यान लागन राहणार आहे. येत्या काळात पंजाब विधानसभा निवडणुका होणार आहेत. म्हणून सुखबीर सिंघ बादल यांचा दौरा कार्यक्रमाकडे विशेष लक्ष आहे.

## आश्रमशाळा,वस्तीगृहांतील चित्रीकरण बंदीचा आदेश तत्काळ मागे घ्या

### अन्यथा आयटीडीपी कार्यालयावर धडक मोर्चा:विकास कुडमथे यांचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट अंतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच वस्तीगृहांमध्ये पूर्वपरवानगी शिवाय त्रैयस्थांना प्रवेश बंदी व व्हिडिओ चित्रीकरणास बंदी घालणारा वादग्रस्त आदेश प्रकल्प कार्यालयाकडून काढण्यात आला आहे. हा आदेश तात्काळ मागे घेण्यात यावा, अन्यथा आदिवासी विद्यार्थी कृती समितीच्या वतीने लोकशाही मार्गाने प्रकल्प अधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा समितीचे अध्यक्ष विकास कुडमथे यांनी दिला आहे.

किनवटचे प्रकल्प अधिकारी बी.सरवनन (भा.प्र.से.) यांनी २९ जुलै २०२६ रोजी एक परिपत्रक (जा. क्र./ शिक्षण/ शाआशा/ संकीर्ण/ का.१० (३) /२४६४/२०२६) जारी केले आहे. या आदेशात म्हटले आहे की, आश्रमशाळा व वस्तीगृहांमध्ये पूर्वपरवानगी न घेता विविध वृत्तवाहिन्या, पत्रकार किंवा इतर व्यक्तींकडून



चित्रीकरण, व्हिडिओ रेकॉर्डिंग अथवा वृत्तांकन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गोपनीयतेवर आणि शालेय शिस्तीवर परिणाम होतो. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव कोणत्याही त्रैयस्थ व्यक्तीस शाळा व वस्तीगृहात प्रवेश देऊ नये, असे निर्देश सर्व मुख्याध्यापक व गृहपालांना दिले आहेत.प्रकल्प अधिकाऱ्यांच्या या निर्णयावर आदिवासी विद्यार्थी कृती समितीने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. आश्रमशाळा व वस्तीगृहांमध्ये विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा, निकृष्ट दर्जाचे जेवण आणि प्रशासकीय त्रुटी उघडकीस येऊ नयेत, यासाठीच हा 'तुघलकी' आणि माहिती दडपणारा आदेश काढण्यात आल्याचा आरोप विद्यार्थी संघटनेने केला आहे.पत्रकारांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना रोखून आश्रमशाळांमधील समस्या दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे हा काढण्यात आलेला जाचक आदेश प्रशासनाने तत्काळ मागे घ्यावा, अन्यथा आयटीडीपी कार्यालयावर आदिवासी विद्यार्थ्यांचा भव्य धडक मोर्चा काढला जाईल, असा सज्जड इशारा विकास कुडमथे यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात दिला आहे.

## विद्यार्थी आंदोलनावरुन अमित शहा-राहुल गांधी आमनेसामने

### चर्चेस तयार-अमित शहा;उत्तरे द्या,लेक्चर नको-राहुल गांधी

नवी दिल्ली:संसदेत नीट आंदोलन आणि विद्यार्थी प्रश्नांवरून सत्ताधारी व विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांवर संसद ठप्प केल्याचा आरोप करत चर्चेचे आव्हान दिले, तर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शाह यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत लाठीहल्ला, गोळीबार कोणाच्या आदेशाने झाला याचे उत्तर द्या, आम्हाला तुमच्या लेक्चरमध्ये रस नसल्याचा जोरदार पलटवार केला. आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विरोधकांच्या प्रश्नांना पत्रकारांसमोर उत्तरे दिली.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा समारोप उद्या १३ ऑगस्ट रोजी होणार आहे. पहिल्या दिवसापासून कामकाज ठप्प आहे. विद्यार्थ्यांच्या संसदेवरील मोर्चावेळी आंदोलनकर्त्यांवर लाठीहल्ला, पाण्याचा मारा, पॅलेटगन द्वारे गोळीबार झाल्याने आंदोलक पहिल्या दिवसापासून आक्रमक आहेत. अमित शाह यांनी आपण अधिवेशन सुरू झाल्यापासून नियमितपणे संसदेत उपस्थित राहत असल्याचे स्पष्ट केले. बेपत्ता, पळून गेले, फरारी अशी भाषा आता सार्वजनिक आणि संसदीय जीवनात ऐकायला मिळत आहे. मी नियमितपणे संसदेत उपस्थित आहे. मात्र विरोधक दोन्ही सभागृहांचे कामकाज रोखत असतील तर काय करता येईल? असा सवाल त्यांनी केला.नीट आंदोलनादरम्यान झालेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या सर्व पैलूंवर सरकार चर्चेस तयार असल्याचे शाह यांनी सांगितले. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही चर्चेसाठी पान ४ वर

## आश्रम शाळांची दुरवस्था

**केंद्र असो अथवा राज्य सरकार, सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, कष्टकरी आणि समाजातील वंचित घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत असते. या योजनांचा मुख्य उद्देश आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना शिक्षण, निवारा आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणे हा असतो. त्यातूनच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे आणि आश्रमशाळांची संकल्पना पुढे आली. मात्र, या योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासणाऱ्या अलीकडच्या घटना अत्यंत अस्वस्थ करणाऱ्या आहेत. गेल्या दोन-तीन दिवसांत आश्रमशाळा आणि वसतिगृहांमधून समोर आलेल्या घटना पाहता प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील अनुदानित आश्रमशाळेच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी पुरेसे पलंग उपलब्ध नसल्याने त्यांना जमिनीवर झोपावे लागले. याच परिस्थितीत विषारी साप चावल्याने सहा विद्यार्थी बाधित झाले आणि त्यापैकी तीन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. विशेष म्हणजे, ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन. आदिवासी समाजाच्या विकासासाठी संकल्प करण्याचा दिवस आणि त्याच दिवशी आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीविताला असा धोका निर्माण होणे, ही केवळ दुर्दैवी घटना नसून व्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित करणारी बाब आहे. दुसरीकडे, नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील एका वसतिगृहात मांसाहारी अन्नातून विषबाधा झाल्याने विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. या दोन्ही घटनांनी आश्रमशाळा आणि वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. या घटना घडल्यानंतर राज्य शासन खडबडून जागे झाले असून, मंत्रिमंडळाच्या बैठकीत संबंधित अनुदानित आश्रमशाळा बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच राज्यातील सर्व आश्रमशाळा आणि वसतिगृहांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.सरकारने घेतलेली ही भूमिका स्वागतार्ह असली तरी प्रश्न असा आहे की, ही वेळ येण्याचीच का गरज पडली? शासनाकडे शिक्षण, आदिवासी विकास, आरोग्य आणि प्रशासनाची मोठी यंत्रणा आहे. आश्रमशाळांना शासनाकडून अनुदान दिले जाते. विद्यार्थ्यांच्या निवास, भोजन, आरोग्य आणि सुरक्षेसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. तरीही विद्यार्थ्यांना जमिनीवर झोपावे लागते, अन्नाच्या गुणवत्तेचा प्रश्न निर्माण होतो आणि त्यांच्या जीविताला धोका निर्माण होतो, ही बाब अत्यंत क्लेशदायक आहे.योजना आखणे हे सरकारचे काम आहे; मात्र त्या योजनांची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अनेक अधिकारी आणि कर्मचारी प्रामाणिकपणे काम करतात; परंतु व्यवस्थेतील काही घटकांनी कर्तव्याकडे दुर्लक्ष केले किंवा शासनाच्या निधीचा गैरवापर केला तर त्याची किंमत निरपराध विद्यार्थ्यांना मोजावी लागते. अशा परिस्थितीत केवळ एखादी आश्रमशाळा बंद करणे किंवा चौकशीचे आदेश देणे पुरेसे ठरणार नाही. आश्रमशाळांची नियमित तपासणी, विद्यार्थ्यांच्या भोजनाची गुणवत्ता, स्वच्छता, आरोग्य सुविधा, इमारतींची सुरक्षितता, पलंग व इतर मूलभूत सुविधा यांचे काटेकोर ऑडिट झाले पाहिजे. त्रयस्थ तपासणी केवळ कागदावर न राहता तिचे निष्कर्ष सार्वजनिक झाले पाहिजेत. दोषी अधिकारी, संस्था चालक किंवा संबंधित व्यक्ती कोणत्याही दबावाला बळी न पडता कठोर कारवाईस पात्र ठरली पाहिजे. आदिवासी आणि गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देणे ही केवळ सरकारी योजना नाही, तर सामाजिक बांधिलकी आहे. त्यांच्या जीवनाशी खेळ करण्याचा अधिकार कोणालाही नाही. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी सरकारने तात्पुरत्या उपायांपेक्षा कायमस्वरूपी आणि कठोर यंत्रणा उभी करण्याची गरज आहे. अन्यथा आश्रमशाळा या विकासाच्या मंदिरांऐवजी दुर्लक्षाचे केंद्र ठरतील. विद्यार्थ्यांचा जीव गेल्यानंतर जागे होणाऱ्या व्यवस्थेपेक्षा, संकट येण्यापूर्वीच जागी असलेली व्यवस्था हीच खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी शासनाची ओळख ठरेल.**

# युवाशक्तीःराष्ट्रनिर्मितीची नवी दिशा



दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. युवक हे कोणत्याही देशाचे वर्तमान आणि भविष्य घडविणारे सर्वांत महत्त्वाचे घटक मानले जातात. तरुणाईमध्ये असलेली ऊर्जा, कल्पकता, धाडस, परिवर्तनाची आस आणि नव्या वाटा शोधण्याची क्षमता समाजाच्या प्रगतीला नवी दिशा देऊ शकते. त्यामुळे युवा दिन हा केवळ युवकांच्या गौरवाचा दिवस नसून, त्यांच्या प्रश्नांचा, अपेक्षांचा, संधींचा आणि जबाबदाऱ्यांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे. जगातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि तांत्रिक परिवर्तनामध्ये युवकांची भूमिका दिवसेंदिवस अधिक महत्त्वाची होत आहे. भारतासारख्या तरुण लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असलेल्या देशासाठी तर युवाशक्ती ही विकासाची सर्वांत मोठी भांडवलशक्ती आहे. या शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य, रोजगार, समान संधी आणि सकारात्मक दिशा मिळाली, तर भारत अधिक सक्षम, समृद्ध आणि न्याय्य राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहू शकतो.

आंतरराष्ट्रीय युवा दिनाची सुरुवात युवकांशी संबंधित प्रश्नांकडे जागतिक पातळीवर लक्ष वेधण्यासाठी झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने युवकांच्या सामाजिक सहभागाला, त्यांच्या हक्कांना आणि विकासातील योगदानाला महत्त्व देत या दिवसाला विशेष स्थान दिले. जगभरातील युवकांना भेडसावणाऱ्या शिक्षण, रोजगार, गरिबी, असमानता, मानसिक ताण, सामाजिक बहिष्कार, हवामान बदल, डिजिटल परिवर्तन आणि शांतता-सुरक्षा यांसारख्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हा दिवस महत्त्वपूर्ण ठरतो. युवकांना केवळ भविष्यातील नागरिक म्हणून पाहण्याऐवजी वर्तमानातील सक्रिय भागीदार म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या मतांना स्थान देणे, निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे आणि त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हे आधुनिक लोकशाहीचे महत्त्वाचे लक्षण आहे.भारताच्या संदर्भात युवकांचे महत्त्व अधिक व्यापक आहे. देशाची मोठी लोकसंख्या तरुण आहे. त्यामुळे भारताकडे जगातील सर्वांत मोठ्या युवा शक्तींपैकी एक शक्ती उपलब्ध आहे. ही लोकसंख्यात्मक स्थिती भारतासाठी मोठी संधी आहे; मात्र ती आपोआप विकासाचे साधन ठरत नाही. युवकांना दर्जेदार शिक्षण, बाजारपेठेला अनुरूप कौशल्ये, रोजगाराच्या संधी, उद्योजकतेसाठी अनुकूल वातावरण आणि सामाजिक सुरक्षितता मिळाली तरच ही लोकसंख्यात्मक संधी आर्थिक व सामाजिक प्रगतीमध्ये रूपांतरित होऊ शकते. अन्यथा बेरोजगारी, अपुरी रोजगारक्षमता, आर्थिक असुरक्षितता आणि सामाजिक निराशा या समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणूनच तरुण भारत ही संकल्पना केवळ लोकसंख्येच्या आकडेवारीपुरती मर्यादित न राहता सक्षम, सुशिक्षित, कुशल, संवेदनशील आणि जबाबदार भारताच्या निर्मितीशी जोडली पाहिजे.

युवकांच्या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास, विवेकशील विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्यांची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. आजच्या बदलत्या जगात पारंपरिक ज्ञानाबरोबरच तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञान, संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि उद्योजकता यांसारख्या कौशल्यांची गरज वाढत आहे. त्यामुळे युवकांना केवळ परीक्षाभिमुख शिक्षण देण्याऐवजी ज्ञान आणि कौशल्य यांचा समन्वय साधणारे शिक्षण देणे आवश्यक आहे. मातृभाषेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण, उच्च शिक्षणाच्या समान संधी आणि ग्रामीण व वंचित विद्यार्थ्यांपर्यंत डिजिटल साधनांची उपलब्धता यांना विशेष महत्त्व द्यावे लागेल.आजच्या युवकांसमोरील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी रोजगाराचे आव्हान महत्त्वाचे आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतरही अनेक तरुणांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार मिळत नाही. काही युवकांना रोजगार मिळतो; परंतु त्यांना त्यांच्या कौशल्यांच्या तुलनेत कमी उत्पन्न किँवा अस्थिर रोजगार स्वीकारावा लागतो. ग्रामीण भागातील युवकांसाठी ही समस्या अधिक गंभीर आहे. शेतीवरील वाढता आर्थिक दबाव, मर्यादित औद्योगिक संधी आणि शहरांकडे होणारे स्थलांतर यामुळे ग्रामीण तरुणांसमोर अनेक प्रश्न उभे राहतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, कृषीपूरक व्यवसाय, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि सामाजिक उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. प्रत्येक तरुणाने सरकारी नोकरीचीच अपेक्षा करण्याऐवजी रोजगार निर्माण करणारा उद्योजक होण्याची संधीही समाजाने उपलब्ध करून दिली पाहिजे.

डिजिटल क्रांतीने युवकांसमोर अभूतपूर्व संधी निर्माण केल्या आहेत. आज एका छोट्या गावातील युवकाला जगभरातील ज्ञानसंपदा काही क्षणांत उपलब्ध होऊ शकते. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल सेवा, स्वतंत्र व्यवसाय, मुक्त व्यावसायिक काम, सर्जनशील उद्योग आणि नवउद्योजकता यामुळे तरुणांसाठी नवीन क्षेत्रे खुली झाली आहेत. परंतु डिजिटल साधनांचा वापर विवेकपूर्ण पद्धतीने करणेही तितकेच आवश्यक आहे. समाजमाध्यमांवरील चुकीची माहिती, अफवा, दिशाभूल करणारे संदेश, ऑनलाइन फसवणूक, अतिरेकी वापर आणि आभासी जगाचे वाढते आकर्षण यामुळे युवकांच्या विचारक्षमतेवर आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होऊ शकतो. म्हणून डिजिटल साक्षरतेबरोबरच डिजिटल जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे; ते जीवनाचा पर्याय नाही, हे युवकांनी लक्षात ठेवले पाहिजे.युवकांच्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक स्वास्थ्य आणि भावनिक सक्षमता यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. स्पर्धेचे वाढते स्वरूप, शैक्षणिक अपेक्षा, रोजगाराची अनिश्चितता, आर्थिक दबाव, सामाजिक तुलना आणि समाजमाध्यमांमधून निर्माण होणारी कृत्रिम यशाची प्रतिमा यामुळे अनेक तरुणांवर मानसिक दबाव वाढत आहे. अपयशाला सामोरे जाण्याची क्षमता, स्वतःच्या भावनांची जाणीव, संवाद साधण्याची सवय आणि आवश्यकतेनुसार योग्य मदत घेण्याची सकारात्मक वृत्ती युवकांमध्ये विकसित करणे गरजेचे आहे. कुटुंब, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी युवकांच्या अडचणींकडे केवळ शिस्तीच्या किँवा यश-अयशाच्या चौकटीत न पाहता संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. मानसिकदृष्ट्या सक्षम युवकच आव्हानांचा सामना करून समाजाच्या विकासात प्रभावी योगदान देऊ शकतो.

डॉ.राजेंद्र बगाटे

युवक आणि सामाजिक परिवर्तन यांचे नाते अतूट आहे. इतिहासात अनेक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींमध्ये तरुणांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक तरुण क्रांतिकारक, समाजसुधारक आणि विचारवंत यांनी देशासाठी मोठे योगदान दिले. महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा अभ्यास केला असता तरुणाईच्या ऊर्जा आणि विचारशक्तीचे महत्त्व स्पष्ट होते. आजच्या काळातील युवकांनी इतिहासातील या प्रेरणांचा अर्थ केवळ गौरवकथांमध्ये शोधू नये, तर सामाजिक जबाबदारी, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांना आपल्या आचरणात स्थान द्यावे.लोकशाहीच्या बळकटीकरणामध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाही केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसून प्रश्न विचारणे, सार्वजनिक धोरण समजून घेणे, सामाजिक समस्यांवर चर्चा करणे, कायद्याचा आदर करणे आणि सार्वजनिक हितासाठी सक्रिय सहभाग घेणे हीदेखील लोकशाहीचीच प्रक्रिया आहे. युवकांनी राजकीय आणि सामाजिक घडामोडींकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. जात, धर्म, भाषा, प्रदेश किँवा अफवांच्या आधारावर मतनिर्मिती करण्याऐवजी संविधानिक मूल्ये, विवेक, तथ्य आणि सार्वजनिक हित यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तरुण पिढीने लोकशाहीतील आपली भूमिका समजून घेतली, तर समाजातील ध्रुवीकरण कमी करून संवाद आणि सहकार्याची संस्कृती विकसित होऊ शकते.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुतेची मूल्ये दिली आहेत. युवकांनी या संविधानिक मूल्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील विषय न मानता जीवनमूल्य म्हणून स्वीकारले पाहिजे. स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, जातीय भेदभावाचा विरोध, वंचित घटकांबद्दल संवेदनशीलता, विविधतेचा आदर आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण या मूल्यांमधूनच आधुनिक भारताची निर्मिती होणार आहे. युवकांच्या विचारविश्वात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधानिक नैतिकता रुजविणे ही कुटुंब, शिक्षणसंस्था आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.युवकांच्या सहभागाशिवाय पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्टही पूर्ण होऊ शकत नाही. हवामान बदल, जलसंकट, प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या भविष्यातील पिढ्यांवर सर्वाधिक परिणाम करणार आहेत. त्यामुळे युवकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, जलसंधारण, वृक्षसंवर्धन, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकासाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. तरुणाईने पर्यावरणाच्या प्रश्नांकडे केवळ आंदोलनाच्या दृष्टीने न पाहता दैनंदिन जीवनातील सवयी बदलण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

ग्रामीण युवकांकडे विशेष लक्ष देणे ही आजची गरज आहे. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्षमता, श्रमशीलता आणि नवकल्पनाशक्ती मोठ्या प्रमाणात आहे; मात्र त्यांना संधींची कमतरता भासते. आधुनिक शेती, कृषीप्रक्रिया, दुग्धव्यवसाय, पर्यटन, हस्तकला, ग्रामीण उद्योग, डिजिटल सेवा आणि स्थानिक संसाधनांवर आधारित व्यवसाय यांच्या माध्यमातून ग्रामीण युवकांसाठी रोजगारनिर्मिती करता येऊ शकते. गावातील युवकांना गावातच गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योजकतेच्या संधी मिळाल्या, तर ग्रामीण स्थलांतराचा दबाव कमी होऊ शकतो. ग्रामीण युवक हा केवळ रोजगाराचा शोध घेणारा घटक न राहता आपल्या गावाच्या विकासाचा नेतृत्वकर्ता बनू शकतो.युवतींच्या सक्षमीकरणाशिवाय युवाशक्तीचा पूर्ण उपयोग होऊ शकत नाही. शिक्षण, रोजगार, सुरक्षितता, आरोग्य, डिजिटल प्रवेश, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेत समान सहभाग या संधी युवतींना मिळणे आवश्यक आहे. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान वाढवायचे असेल, तर मुलींच्या शिक्षणाला आणि त्यांच्या स्वावलंबनाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील युवतींसाठी विशेष कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. महिला सक्षम झाल्या की कुटुंब, समाज आणि अर्थव्यवस्था या तिन्ही स्तरांवर सकारात्मक परिवर्तन घडते.

आजच्या युवकांसाठी मूल्याधिष्ठित नेतृत्वाची गरज आहे. नेतृत्व म्हणजे केवळ पद, अधिकार किँवा प्रसिद्धी नव्हे. नेतृत्व म्हणजे जबाबदारी स्वीकारणे, इतरांना सोबत घेणे, अडचणींवर उपाय शोधणे आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणे. युवकांनी समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष सामाजिक कार्याला महत्त्व दिले पाहिजे. रक्तदान, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, साक्षरता, पर्यावरण संरक्षण, ग्रामविकास, सामाजिक समता आणि नागरिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये तरुणांनी सहभाग घेतला तर समाजातील सकारात्मक शक्ती अधिक बळकट होईल.युवकांनी स्वतःच्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. देशाकडून संधी मिळाव्यात अशी अपेक्षा करताना देशासाठी आपले योगदान काय असू शकते, हा प्रश्नही प्रत्येक तरुणाने स्वतःला विचारला पाहिजे. प्रामाणिकपणे शिक्षण घेणे, कौशल्य आत्मसात करणे, कायद्याचा आदर करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरणाची काळजी घेणे, सामाजिक सलोखा राखणे आणि गरजू व्यक्तींना मदत करणे ही राष्ट्रनिर्मितीचीच कामे आहेत. देशभक्ती केवळ घोषणांमध्ये नसून आपल्या दैनंदिन आचरणात दिसली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने शासन, शिक्षणसंस्था, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांनी युवकांकडे अधिक विश्वासाने पाहण्याची गरज आहे. युवकांना केवळ समस्या म्हणून पाहण्याऐवजी ते समस्यांचे समाधान देऊ ***पान ३ वर***

# मी डाव्या चळवळीत का आहे?

मानव इतिहास हा शोषण आणि प्रतिकार यांच्यातील संघर्षाचा इतिहास आहे. या संघर्षात ज्या बाजूने सामान्य माणूस उभा राहतो, त्याच बाजूला डावी चळवळ उभी असते. मी डाव्या चळवळीत आहे कारण मला अन्यायाच्या विरोधात बोलायचं आहे, समतेसाठी जगायचं आहे आणि माणसाला माणूस म्हणून जगवायचं आहे.


**१. माणसाचं जगणं हे केंद्रबिंदू :** डाव्या विचारसरणीचा पाया एका वाक्यात सांगायचा तर तो आहे, माणूस.जात, धर्म, प्रांत, भाषा या सगळ्याच्या वर माणसाचं पोट, त्याची शिक्षणाची संधी, त्याच्या मुलांचं भविष्य येतं.

शेतात रानात, जिथं घामानं भिजली धरती या ओळी डाव्या चळवळीचं सार सांगतात. जो माणूस कष्ट करतो त्यालाच सन्मान मिळाला पाहिजे. आजही शेतकरी आत्महत्या करतो, कामगाराला किमान वेतन मिळत नाही, तरुण बेरोजगार फिरतो. बाजार आणि नफा यांच्या पुढे माणूस दुय्यम होतो. डावी चळवळ या व्यवस्थेला प्रश्न विचारते आणि सांगते की अर्थव्यवस्था माणसासाठी असली पाहिजे, माणूस अर्थव्यवस्थेसाठी नाही.

**२. समतेच्या वाटेवरची लढाई :** वाडे जातीपातीचे,ज्यात माणसं कोंडली ही फक्त कविता नाही, हे आपल्या आजूबाजूचं वास्तव आहे. जन्माच्या आधारावर कोणाला संधी मिळते आणि कोणाला नाकारलं जातं हे आपण बघतोच.

डावी चळवळ जातीभेद, लिंगभेद, धार्मिक भेदभाव यांच्या विरोधात आहे. कारण जोपर्यंत समाजात असमानता आहे तोपर्यंत लोकशाही अपूर्ण आहे. सर्वांना समान संधी ही फक्त घोषणांमधून उतरून शाळा, दवाखाना, नोकरीपर्यंत पोहोचली पाहिजे. म्हणून सार्वजनिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य यासाठी डावी चळवळ आग्रही असते. कारण श्रीमंताच्या मुलाला आणि गरीबाच्या मुलाला एकच दर्जाचे शिक्षण मिळाले तरच खरी समता येईल.

**३. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे :** अन्यायाविरुद्ध, जिथं मुठी हो वळल्या लोकशाही म्हणजे फक्त ५ वर्षातून एकदा मतदान करणे नव्हे. सत्ताधाऱ्यांनी चूक केली तर त्यांना जाब विचारणे ही देखील लोकशाही आहे.



जेव्हा आदिवासींच्या जमिनी हिसकावल्या जातात, जेव्हा पत्रकारांवर हल्ले होतात, जेव्हा विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती कापल्या जातात, तेव्हा डावी चळवळ रस्त्यावर उतरते. ती सत्तेला घाबरत नाही कारण तिची ताकद जनतेत असते. इवल्याशा या चिमण्या, जिथं घारीशी हो भिडल्या. ही ओळ डाव्या कार्यकर्त्यांचं काम दाखवते. मोठ्या व्यवस्थेविरुद्ध लहान माणूस देखील लढू शकतो हा विश्वास ती देते.

**४. मी ऐवजी आपण :** भांडवलशाही स्पर्धा शिकवते. डावी चळवळ सहकार्य शिकवते. माझ्या शेजाऱ्याचं घर जळत असेल तर मी माझं घर सुरक्षित आहे म्हणून शांत बसू शकत नाही. म्हणूनच डावी चळवळ रुग्णालये, रस्ते, पाणी, वीज या मूलभूत सुविधा या नफ्यासाठी नसून हक्क म्हणून मिळाल्या पाहिजेत अशी मागणी करते. कोरोना काळात आपण बघितलं. खाजगी हॉस्पिटल परवडले नाहीत, तेव्हा सरकारी व्यवस्थाच कामाला आली. म्हणून डावी चळवळ सार्वजनिक क्षेत्र मजबूत करण्याची बाजू घेते.

**५. टीका आणि आत्मपरीक्षण :** डावी चळवळ परिपूर्ण आहे असं मी म्हणणार नाही. कुठे-कुठे ती सत्तेपासून दूर गेली, कुठे-कुठे तिच्यात अंतर्गत वाद झाले. काही वेळा फक्त निषेध करून पर्याय न देण्याची टीकाही होते. पण या चुका मान्य करून सुधारण्याची क्षमता देखील डाव्या विचारात आहे. कारण डावी चळवळ दगडावरची रेघ नसते, ती वाहत्या पाण्यासारखी असते - काळानुसार बदलणारी.

**तर मी डाव्या चळवळीत का आहे? :** कारण मला असा समाज हवा आहे जिथे बंधन तोडीत प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्याने जगेल., जिथे कष्टाला किंमत असेल आणि रक्तचंदन सारखा त्याग वाया जाणार नाही., जिथे एखाद्या मुलाला फक्त तो गरीब आहे म्हणून शाळा सोडावी लागणार नाही. डावी चळवळ म्हणजे द्वेष नाही. ती प्रेम आहे, माणसावरचं प्रेम. ती निराशा नाही, ती आशा आहे. उद्याचा दिवस आजपेक्षा चांगला असेल याची आशा. जोपर्यंत समाजात एकही माणूस भुकेला आहे, जोपर्यंत एकही मुलगी शाळेबाहेर आहे, तोपर्यंत समतेच्या वाटेनं चालणं थांबवता येणार नाही. आणि म्हणूनच मी डाव्या चळवळीत आहे.

**- कॉ.प्रफुल्ल कउडकर,**
संपर्क-८४११९२७५५८.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# लोहा येथे टँकरच्या धडकेने वृद्ध महिलेचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-लोहा शहरातील शासकीय विश्रामगृहासमोरील पेट्रोलपंपासमोर नांदेडकडे जाणाऱ्या दुधाने भरलेल्या टँकरच्या मागील चाकाखाली येऊन एकोणसत्तरवर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ११ रोजी सकाळी सात वाजता घडली. पोलिसांनी टँकरचालकास ताब्यात घेतले.

लोहा शहरातील सायाळ रोड भागातील रहिवासी भागीरथाबाई रामदास पुदिंगे (६९) ही वृद्ध महिला सकाळी ७ वाजता घरुन निघून नांदेड रस्त्याने पायी जात असताना शासकीय विश्रामगृहासमोरील पेट्रोलपंपासमोर लोह्याकडून नांदेडकडे भरधाव वेगात जाणाऱ्या दुधाने भरलेल्या टँकर (क्र. टीएस-०८-यूएल-०१७१) च्या पाठीमागील चाकाखाली भागीरथाबाई आल्याने चिरडून त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात एवढा भीषण होता की, त्यांच्या शरीराच्या खालील भाग चेंदामेंदा झाल्याने रस्त्यावर रक्त मांसाचा सडा पडला होता. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवून टँकरचालकास अटक केली आहे.

# नांदेड जिल्ह्यातील अमृत भारत रेल्वे स्थानकांच्या कामांचा दर्जा सुधारावा

## खा.रवींद्र चव्हाण यांची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील अमृत भारत रेल्वे स्थानकांच्या कामांचा दर्जा सुधारावा यासह विविध समस्या आणि मागण्यांकडे लक्ष वेधत खा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. अमृत भारत रेल्वे स्थानक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा दर्जा सुधारण्या बरोबरच नांदेड-मुंबई राज्यराणी एक्स्प्रेसला आधुनिक एलएचबी कोच उपलब्ध करून देणे आणि निजामाबाद-तिरुपती रायळसीमा एक्स्प्रेस नांदेडपर्यंत विस्तारित करून नियमित सुरू करणे, या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

अमृत भारत रेल्वे स्थानक योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील विविध रेल्वे स्थानकांच्या आधुनिकी-करणाची कामे सुरू आहेत. या कामांवर मोठ्या प्रमाणात सार्वजनिक निधी खर्च होत असताना काही ठिकाणी कामांचा दर्जा अपेक्षेप्रमाणे नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. त्यामुळे संबंधित कामांची सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करून कामांचा दर्जा निश्चित मानकांनुसार राखण्यात यावा, अशी मागणी खा. चव्हाण यांनी केली आहे.निकृष्ट दर्जाचे काम आढळून आल्यास संबंधित कँत्राटदाराकडून ते काम दुरुस्त करून किंवा आवश्यकतेनुसार पुन्हा करून घेण्यात यावे, तसेच भविष्यातील कामांमध्ये गुणवत्ता नियंत्रण अधिक प्रभावी करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. अमृत भारत योजनेचा उद्देश रेल्वे स्थानकांचा आधुनिक आणि सर्वांगीण विकास करणे हा असून, प्रवाशांना प्रत्यक्षात चांगल्या सुविधा मिळणे आवश्यक असल्याचे खा. चव्हाण यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नांदेड-मुंबई राज्यराणी एक्स्प्रेसमध्ये आधुनिक एलएचबी कोच उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी रेल्वेमंत्र्यांकडे केली आहे. नांदेड आणि मराठवाड्यातील प्रवाशांसाठी ही महत्त्वाची रेल्वे सेवा असून, सध्या वापरात असलेल्या जुन्या प्रकारच्या कोचच्या तुलनेत एलएच बी कोच उपलब्ध झाल्यास प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाची सुविधा मिळणार आहे. वाढतो प्रवासी संख्या लक्षात घेता या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती त्यांनी केली आहे. यासोबतच निजामाबाद - तिरुपती रायळसीमा एक्स्प्रेस नांदेडपर्यंत विस्तारित करून तिचे नियमित संचालन सुरू करावे, अशी मागणीही खासदार चव्हाण यांनी केली आहे. सध्या ही रेल्वे निजामाबाद आणि तिरुपतीदरम्यान धावत असून, मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी तसेच परिसरातील प्रवाशांना या सेवेचा मोठा फायदा होऊ शकतो. नांदेडपर्यंत विस्तार झाल्यास धार्मिक पर्यटन, व्यापार, शिक्षण आणि रोजगारासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध होईल.

# भाविकांच्या सुविधांसाठी श्री परमेश्वर मंदिर समितीची आढावा बैठक संपन्न

हिमायतनगर/प्रतिनिधी-हिमायतनगर येथील जागृत देवस्थान श्री परमेश्वर मंदिरात श्रावण मासानिमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी सुलभ दर्शन व्यवस्था, वाहतूक नियोजन, स्वच्छता तसेच इतर मूलभूत सुविधांचा आढावा घेण्यासाठी सोमवार, दि.११ ऑगस्ट रोजी मंदिर समितीची बैठक घेण्यात आली.

श्री परमेश्वर मंदिर समितीच्या पदसिद्ध अध्यक्षा तथा तहसीलदार सौ. पल्लवी टेमकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. यावेळी मंदिराचे उपाध्यक्ष महावीरसेठ श्रीश्रीमाळ, सचिव अनंता देवकते, पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, नगरपंचायत मुख्याधिकारी समाधान मासाळ, बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी श्री. दुबे, श्री परमेश्वर मंदिराचे संचालक प्रकाश शिंदे, प्रकाश कोमावार, मथुराबाई भोयर, लताताई मुलंगे, लताबाई पाध्ये, ॲड.दिलीप राठोड, अनिल मादसवार, संजय माने, विलास वानखेडे, गजानन मुत्तलवाड व इतर उपस्थित होते. बैठकीत श्रावण महिन्यात मंदिरात वाढणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन दर्शन रांगेचे नियोजन, वाहतूक व्यवस्था, पार्किंग, मंदिर परिसरातील स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था तसेच भाविकांना आवश्यक असलेल्या इतर सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या योग्य पद्धतीने पार पाडाव्यात, अशा सूचना यावेळी तहसीलदार सौ. पल्लवी टेमकर यांच्या वतीने करण्यात आले.हिमायतनगर येथील श्री परमेश्वर मंदिर हे धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे देवस्थान असून, येथे हरिहराच्या रूपातील श्री परमेश्वराची उभी मूर्ती असल्याचे सांगितले जाते. नवसाला पावणारा परमेश्वर म्हणून या देवस्थानाची सर्वदूर ख्याती आहे. त्यामुळे महाशिवरात्र तसेच श्रावण महिन्यात महाराष्ट्रासह विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी करतात.

# भ्रष्टाचार विरोधी जनजागृतीसाठी सायन्स महाविद्यालयात शुक्रवारी कार्यशाळा

नांदेड/प्रतिनिधी-भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने नांदेड येथील सायन्स महाविद्यालयात १४ ऑगस्ट रोजी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयातील आयक्यूएसी, करिअर मार्गदर्शन विभाग आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप हे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमातील विविध तरतुदी, भ्रष्टाचारा विरोधातील कायदेशीर उपाययोजना तसेच नागरिकांच्या हक्कांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळे दरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थी पथनाट्याच्या माध्यमातून भ्रष्टाचार विरोधी जनजागृती करणार आहेत. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी नागरिकांनी कायद्याची माहिती घेणे आणि भ्रष्टाचाराविरोधात सजग राहणे आवश्यक असल्याचा संदेश या माध्यमातून देण्यात येणार आहे. सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे यांनी नांदेड परिक्षेत्रातील भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाबाबत माहिती जाणून घेण्यास इच्छुक नागरिक, विद्यार्थी आणि संबंधितांनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.



जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले यांनी आज (बुधवार) दुपारी सोमेश्वर शिवारातील शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पाहणी केली. शेतकरी दिनाजी बोकारे यांच्या शेताला भेट देवून त्यांनी शेतातील सोयाबीन,गुलाबगोबी व इतर पिकांची माहिती घेवून पाहणी केली. यावेळी मंडळ अधिकारी मधुकर फुलोळे,तलाठी गजानन होळगे, सोमाजी बोकारे व इतर उपस्थित होते.

# वाटणीपत्रावरुन स्वतंत्र सातबारासाठी खरबीतील शेतकऱ्यांचा एल्गार

## १३ ऑगस्टपासून आमरण उपोषण

उमरखेड/प्रतिनिधी-वाटणीपत्राच्या आधारे स्वतंत्र फेरफार करून स्वतंत्र सातबारा उतारे देण्याच्या मागणीसाठी खरबी येथील कास्तकारांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. लेखी आश्वासन न मिळाल्यास १३ ऑगस्टपासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा जिल्हाधिकारी यवतमाळ यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

याबाबत ६ ऑगस्ट रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, २०२४ पासून घरगुती वाटणीपत्रानुसार स्वतंत्र वहिवाट आणि ताबा असूनही, वाटणीधारकांची संमती असतानाही प्रशासन फेरफार घेत नाही. या मागणीसाठी त्यांनी तहसीलदारांकडे २१ सप्टेंबर २०२४ पासून ते ६ ऑगस्ट २०२६ पर्यंत ७ वेळा अर्ज केले आहेत. जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांकडेही निवेदने दिली, मात्र ठोस कारवाई झाली नाही. यापूर्वी १५ ऑगस्ट २०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात केलेले उपोषण अतिवृष्टीमुळे प्रशासनाने सोडवून घेतले होते, पण आश्वासन पाळले नाही, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या आमरण उपोषणाला खरबी येथील विलास अंभोरे, गणपत बोंबले, लक्ष्मण हराळ, बालाजी राजन, संजय ढोले आणि मारोती वाळके हे शेतकरी बसणार आहेत.


## जाहीर प्रगटन

मे.दुसरे सह-दिवाणी न्यायाधीश क.स्तर कंधार यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२५८/२०२६
MHND

अर्जदार : १) सुनिता भ्र.आनंदराव केंद्रे वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा.नागलगाव ता.कंधार जि.नांदेड, २) मारोती पि.आनंदराव केंद्रे वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा.नागलगाव ता.कंधार जि.नांदेड, ३) विशाल पि.आनंदराव केंद्रे वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा.नागलगाव ता.कंधार जि.नांदेड, ४) विकास पि.आनंदराव केंद्रे वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा.नागलगाव ता.कंधार जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.नांदेड शाखा कंधार ता.कंधार जि.नांदेड तर्फे शाखाधिकारी.

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ नुसार

ज्याअर्थी वरील सदरील प्रकरणातील अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई असुन अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ आहेत. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडिल नामे आनंद आप्पाराव केंद्रे हे होते ते दिनांक २६/०२/२०२५ रोजी नागलगाव ता.कंधार येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांचे म्हणने आहे की, अर्जदारां शिवाय इतर कोणीही मयताचे वारस नाहीत.

उपरोक्त मयत आनंद आप्पाराव केंद्रे यांनी गैरअर्जदार बँके मध्ये बचत खाते क्र.१०४४११००२००२१३१ काढले होते. सदरील खात्यात मयताच्या नावाने रक्कम रुपये ८०,८४९/- (ऐंशी हजार आठशे एकोणपन्नास रुपये) जमा आहेत. मयत आनंद आप्पाराव केंद्रे यांच्या नावाने जमा असलेली रक्कम उचलण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्या अर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहिर प्रगटन द्वारे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत आनंद आप्पाराव केंद्रे यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अथवा वकिला मार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन योग्य तो हुकुम पारित केला जाईल. याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २८/८/२०२६

आज रोजी दिनांक ५/८/२०२६ रोजी माझ्या सहि व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**वरिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार


# पाटोदा बु.च्या विकासासाठी १० लाखांचा निधी देऊ-आ.भीमराव केराम



मांडवी/प्रतिनिधी-पाटोदा बु. गावातील वाचनालयासाठी ५ लाख रुपये आणि ग्रामपंचायतीच्या संरक्षक भिंतीसाठी ५ लाख रुपये, असा एकूण १० लाखांचा निधी देण्याचे आश्वासन आ.भीमराव केराम यांनी पाटोदा बु. येथील ग्रामपंचायत इमारतीच्या लोकार्पण सोहळ्यात दिले.

मंगळवार दि.११ रोजी पाटोदा बु. येथे नवनिर्मित ग्रामपंचायत इमारतीचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वेदिका गणेश उईके तर स्वागताध्यक्ष म्हणून मधुकर सोनुले उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर मांडवीच्या सरपंच सुमनबाई पेंदोर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, नवीन राठोड, रमेश बद्दीवार, बजरंगरेड्डी सिगडवार, संजयरेड्डी येलटीवार, मधुकर शेंडे, दिनेश रुणवाल, प्रवीण श्रीमनवर, गजानन बंडेवार, योगेश जाधव,सरपंच नम्रता गेडाम, संतोष चादेकर विनोद रेड्डी, रमेश राऊलवार यांच्यासह परिसरातील विविध मान्यवर उपस्थित होते.आपल्या विधानसभा क्षेत्रात आतापर्यंत ३५० हून अधिक सांस्कृतिक सभागृहांच्या बांधकाम करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, पाटोदा बु. येथे माळी समाजासाठी समाजमंदिर आणि बौद्ध समाजासाठी विहार बांधण्याची मागणी लवकरच पूर्ण करू, असा शब्द त्यांनी गावकऱ्यांना दिला. तसेच मांडवी भागातील सर्व ग्रामपंचायत निधी दिलो पुढे देऊ असे सांगितले. दरम्यान, क्षेत्रात सुरू असलेल्या 'जल जीवन मिशन'च्या धीम्या गतीबद्दल आणि कामाच्या दर्जाबाबत त्यांनी तीव्र खेद व्यक्त केला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आमदाराच्या हस्ते करण्यात आला. या सोहळ्याला परिसरातील अनेक गावांचे सरपंच, उपसरपंच आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक गणेश उईके केले तर सूत्रसंचालन गजेंद्र बोडेवार सर यांनी केले.


### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - ३१/०७/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार मारोती दत्तराम कदम रा.बामणी प.क. ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.मारोती दत्तराम कदम रा.बामणी प.क. ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव मारोती दत्तराम कदम रा.बामणी प.क. ता.कंधार या ठिकाणी दिनांक २६/०१/२०१० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २८/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ३१/०७/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - ०३/०८/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार रामेश्वर संजय इंगोले रा.भुत्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.रामेश्वर संजय इंगोले रा.भुत्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव रामेश्वर संजय इंगोले रा.भुत्याचीवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक २४/०३/२००७ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०३/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०३/०८/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार


पान २ वरुन

## युवाशक्तीः...

शकतात, असा दृष्टिकोन विकसित करावा लागेल. त्यांना निर्णयप्रक्रियेत स्थान, नवकल्पनांना प्रोत्साहन, संशोधनासाठी संधी, कौशल्यविकासासाठी साधने आणि उद्योजकतेसाठी आवश्यक आधार दिला पाहिजे. शहरी आणि ग्रामीण, श्रीमंत आणि गरीब, डिजिटल साधनांनी सक्षम आणि डिजिटल सुविधांपासून वंचित अशा युवकांमधील दरी कमी करण्यासाठीही ठोस प्रयत्न आवश्यक आहेत.आज भारतासमोर विकसित आणि समताधिष्ठित राष्ट्र घडविण्याचे मोठे स्वप्न आहे. हे स्वप्न केवळ शासनाच्या योजनांनी पूर्ण होणार नाही. त्यासाठी जागरूक, कुशल, सर्जनशील आणि जबाबदार नागरिकांची आवश्यकता आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी युवक असतील. भारताची युवा शक्ती जर ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि संविधानिक मूल्यांशी जोडली गेली, तर देशाच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळू शकते. मात्र त्यासाठी युवकांना संधी देण्याबरोबरच त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचीही गरज आहे.

आंतरराष्ट्रीय युवा दिन हा त्यामुळे केवळ उत्सवाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण आपल्या युवकांना कोणत्या संधी देत आहोत, त्यांच्या प्रश्नांकडे किती गांभीर्याने पाहत आहोत आणि त्यांच्या स्वप्नांना किती व्यापक आकाश देत आहोत, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. युवक ही राष्ट्राची केवळ भविष्यातील आशा नाही; ते वर्तमानातील परिवर्तनाचे सक्रिय शिल्पकार आहेत. त्यांच्या हातात ज्ञानाची शक्ती, विचारांची प्रगल्भता आणि तंत्रज्ञानाची साधने आहेत. या शक्तीला योग्य दिशा मिळाली, तर सामाजिक विषमता कमी करता येईल, आर्थिक विकासाला चालना देता येईल आणि लोकशाही अधिक सक्षम करता येईल. म्हणूनच आजच्या युवा पिढीसमोर एकच संदेश असायला हवा तो म्हणजे स्वप्ने मोठी पाहा, परंतु त्यासाठी परिश्रम करण्याची तयारी ठेवा; तंत्रज्ञानाचा स्वीकार करा, परंतु विवेक सोडू नका; यशाचा पाठपुरावा करा, परंतु मूल्यांचा त्याग करू नका; स्वतःच्या प्रगतीचा विचार करा, परंतु समाजाची जबाबदारी विसरू नका. राष्ट्रनिर्मिती ही केवळ नेत्यांची किंवा शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक पिढीची सामूहिक जबाबदारी आहे. त्या जबाबदारीचे सर्वाधिक सामर्थ्यवान वाहक म्हणजे युवक. म्हणूनच सक्षम युवक, समताधिष्ठित समाज आणि विकसित भारत ही तीन उद्दिष्टे परस्परांपासून वेगळी नसून एकमेकांशी घट्ट जोडलेली आहेत. युवाशक्तीला योग्य दिशा, समान संधी आणि मूल्याधिष्ठित नेतृत्व मिळाले, तर भारताच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग निश्चितच अधिक भक्कम होईल. आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने हीच युवाशक्ती राष्ट्राच्या प्रगतीची नवी ऊर्जा ठरावी, हीच अपेक्षा.

# हदगाव नगर परिषदेत 'सभापती' पदांचा घोळ;सहा महिन्यांपासून राजकीय तिढ्याने विकास ठप्प?




**शेख चांदपाशा**

हदगाव:हदगाव नगर परिषदेची निवडणूक होऊन जवळपास सहा महिने उलटले, नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष विराजमान झाले असून मात्र नगर परिषदेच्या कारभाराचा कणा मानली जाणारी स्थायी समिती अद्याप अस्तित्वात आलेली नाही. परिणामी स्वच्छता, आरोग्य, बांधकाम तसेच महिला व बालविकास समित्यांच्या सभापतींची पदे आजही रिक्त आहेत. या विलंबामागे केवळ प्रशासकीय कारणे आहेत की, राजकीय गणिते, याची चर्चा शहरभर रंगली आहे.

नगराध्यक्षपदी शिवसेना (शिंदे) गटाच्या रोहिणी भास्कर वानखेडे आहेत, तर उपनगराध्यक्षपदी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या सुनंदा भोळे कार्यरत आहेत. मात्र सभापतीपदांच्या वाटपावरून राजकीय पेच निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. नगर परिषदेतील संख्याबळही या तिढ्याला कारणीभूत असल्याचे बोलले जाते. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे ७, शिवसेना (शिंदे) गटाचे ६, काँग्रेसचे ५, भाजपचे ३, तर महाविकास आघाडी आणि महायुती समर्थक प्रत्येकी एक सदस्य आहेत. या संख्याबळामुळे प्रत्येक गटाला सभापती पदांवर आपला दावा मजबूत करायचा असून, त्यातूनच निर्णय लांबत असल्याची राजकीय चर्चा आहे. स्थायी समिती नसल्याने विविध विभागांतील प्रस्ताव, विकासकामांचे प्राधान्यक्रम, निधीचे नियोजन आणि प्रशासकीय निर्णय अपेक्षित गतीने होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. शहरातील स्वच्छता, रस्ते, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न प्रलंबित असताना लोकप्रतिनिधी मात्र सत्तेच्या समीकरणात व्यस्त असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. विशेष म्हणजे, नगर परिषदेत सत्तेचे समीकरण वेगळे आणि उपनगराध्यक्षपदाचे समीकरण वेगळे असल्याने सभापती पदांच्या वाटपात कोण माघार घेणार?, हा खरा प्रश्न बनला आहे. त्यामुळे राजकीय प्रतिष्ठेचा हा सामना आता नगर परिषदेच्या प्रशासनावरही परिणाम करत असल्याचे चित्र दिसत आहे. आता प्रश्न असा उपस्थित होत आहे की, सभापतीपदांचा निर्णय नेमका कधी होणार? शहराच्या विकासाला प्राधान्य मिळणार की राजकीय तडजोडी पूर्ण झाल्यानंतरच स्थायी समितीची स्थापना होणार? या प्रश्नांची उत्तरे मिळण्याची प्रतीक्षा हदगाव शहरवासीयांना लागली आहे.

### विकासाकरिता बांधील आहोत:गोपाल सारडा

शहरातील नागरिकांच्या नागरी समस्या सोडवण्याबरोबर विकासाकरिता बांधील आहोत शिवसेना (उबाठा) काँग्रेस व भाजपा ह्या नगरसेवकांनी आमच्याशी बोलणी करावी, आम्ही नागरी विकासाच्या दृष्टीने कधीही तयार आहोत. यामध्ये आमची कोणतीही अडचण नाही. त्यानीच पर्याय सुचवावेत, अशी माहिती हदगाव न.पा. सभागृहाचे शिवसेना शिंदे गटाचे गटनेते गोपाल सारडा यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना दिली.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते शासकीय वैद्यकीय रुग्णालय वजिराबाद मार्गावर प्रतिबंधात्मक आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त शनिवार १५ ऑगस्ट रोजी शासकीय ध्वजारोहण समारंभ सोहळा शांततेत पार पाडण्यासाठी याकाळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये या दृष्टीकोनातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा-छत्रपती शिवाजी महाराज पुतळा-जिल्हाधिकारी कार्यालय-महात्मा गांधी यांचा पुतळा ते तहसिल कार्यालय नांदेड, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड, शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय तथा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय रुग्णालय वजिराबाद नांदेड या मार्गावर १३ ऑगस्ट रोजीचे सकाळी ९ वाजेपासून ते १५ ऑगस्ट २०२६ च्या २४.०० वाजेपर्यंत उपोषणे, आत्मदहने, धरणे, मोर्चा, रॅली, सत्याग्रह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे. या मार्गावर शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी या काळात उपोषणे, आत्मदहने, धरणे, मोर्चा, रॅली, सत्यागृह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे. संबंधीतावर नोटीस बजावुन त्यांचे म्हणने ऐकुन घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने आणीबाणीच्या प्रसंगी भारतीय नागरिक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार एकतर्फी आदेश निर्गमीत करण्यात आला आहे.

## पुरग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी

मांडवी/प्रतिनिधी-मांडवी परिसरात दि.३० व ३१ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीच्या पावसामुळे नाल्याला पुर आला होता. पुरामुळे मौ. भिकुनाईक तांडा येथील शेतकऱ्यांची पिकासह शेतजमीन खरडून गेल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यासंदर्भात तातडीने नुकसान भरपाई मिळावी, नाल्यावर सुरक्षा भिंत बांधण्यात यावी तसेच मागील वर्षाच्या थकीत मदतीची चौकशी करावी अशी मागणी पुरग्रस्त शेतकऱ्यांनी तहसिलदार किनवट यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मौ. भिकुनाईक तांडा येथील गट क्र. ४२, ४८, २६/५, २७/१, २७/२ आणि २७/३ मधील शेतजमिनी मांडवी नाल्याच्या काठी आहेत. नाल्याला सुरक्षा भिंत नसल्यामुळे ३० आणि ३१ जुलै रोजी आलेल्या पुराचे पाणी थेट शेतात घुसले. यामुळे उभी पिके वाहून गेलीच, शिवाय शेतातील सुपीक मातीही पार खरडून गेली आहे. त्यामुळे संबंधित शेतकरी संकटात सापडले आहेत. नुकसानीचे पंचनामे करून बाधित भूधारकांना त्वरित अर्थसहाय्य देण्यात यावे., भविष्यात होणारे नुकसान टाळण्यासाठी नाल्यावर तातडीने सुरक्षा भिंत बांधण्यात यावी., गेल्या वर्षी झालेल्या नुकसानीची भरपाई कृषी सहाय्यक यांच्या हलगर्जीपणामुळे मिळाली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला असून, या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अरविंद जयसिंग पवार व इतर बाधित शेतकऱ्यांनी हे निवेदन दिले आहे.

## नगरसेवक कृष्णा तिमापुरे यांच्या प्रयत्नामुळे वार्डात बोअरचा प्रश्न मिटला

धर्माबाद/प्रतिनिधी-प्रभाग आठ मधील नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवण्यावर भर देणारे नगरसेवक कृष्णा तिमापुरे यांनी आपल्या कार्यपद्धतीमुळे नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे. एक कॉल...प्रॉब्लेम सॉल अशी त्यांची ओळख प्रभागात निर्माण केली असून नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असल्याचे चित्र आहे.

नगरसेवक पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी रस्ते, नाले, स्वच्छता, पिण्याचे पाणी यासारख्या मूलभूत प्रश्नावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. शहरातील काही भागात पावसाळ्यात नळाला पाणी कधी येते तर कधी येत नाही. फुलेनगर येथील बोअर अडीच वर्षापासून बंद होती. तक्रार प्राप्त होताच त्यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या ऐकून घेऊन तात्काळ बोअरवेल मशीन घेऊन आले. बोअरमध्ये अडकलेला गाळ काढण्यात आला. त्यामुळे बोअरला पुन्हा पाणी सुरु झाल्याने नागरिकांचे समाधान केले. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याची निर्माण होणारी संभाव्य समस्या वेळीच दूर झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.याशिवाय घंटागाडी वेळेवर येते का, परिसरात नियमित स्वच्छता होती का आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत आहे का याचीही ते नियमित पाहणी करत आहेत. प्रत्येकाच्या सुखदु:खात सहभागी होत असत. कुटुंबातील जबाबदार व्यक्तीप्रमाणे नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न नगरसेवक कृष्णा तिमापुरे हे नेहमीच करीत असतात.



## महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर; जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

नांदेड/प्रतिनिधी-माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकररावजी नाईक यांचा जन्मदिन २१ ऑगस्ट हा दिवस जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने राज्यात १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान जलसंधारण सप्ताह आयोजित करण्यात येणार आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर या उपक्रमाच्या आयोजनाबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत राज्यव्यापी जनजागृती करून जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर या उपक्रमाचे राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजन करण्यात येणार आहे. याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.तसेच येत्या १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यात जलसंधारण सप्ताह प्रभावीपणे साजरा करण्याच्या दृष्टीने संबंधित सर्व यंत्रणांनी आवश्यक नियोजन करून समन्वयाने कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

## १२ हजार वृक्षांचा संकल्प,किनवटमध्ये उभे राहणार ऑक्सिजन झोन



किनवट/प्रतिनिधी-किनवट नगरपरिषदेच्या कार्यकक्षेतील सुभाषनगर भागातील पाण्याची टाकी परिसरात १२ हजार वृक्ष लागवडीचे लक्ष आखले असून ११ ऑगस्ट रोजी सुरुवात करण्यात आली आहे. सामाजिक वनीकरण विभाग आणि नगरपरिषदेच्या संयुक्त विद्यमाने हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत एक पेड माँ कें नाम उपक्रमातून आ.भीमराव केराम आणि नगराध्यक्षा सौ.सुजाताताई एंड्रलवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांच्या माध्यमातून आणि नगरपरिषदेच्या संयुक्त विद्यमाने किनवट नगरपरिषदेच्या कार्यकक्षेतील सुभाषनगर येथील पाण्याच्या टाकी परिसरात १२ हजार वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला आहे. ३ जुलै रोजी डम्पिंग ग्राउंड परिसरासह शहरात ९ हजार वृक्ष लागवडीला सुरुवात करण्यात आलीय. १५ जून ते ३० सप्टेंबर अखेर उद्दिष्ट्यपुर्ती करणार असल्याचे सांगितले. किनवट नगरपरिषद हद्दीतील सुभाषनगर येथील पाण्याच्या टाकीच्या परिसरातील ४० आर क्षेत्रात १२ हजार वृक्षांची लागवड करून घनवन विकसित केले जाणार आहे. एक पेड माँ के नाम या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला आहे. एक व्यक्ती एक वृक्ष हा उपक्रम राबविण्याची आज काळाची गरज बनलीय. पर्यावरण रक्षणासाठीच्या सर्व मार्गांवर घाव घालण्यात आल्याने नैसर्गिक असमतोल निर्माण होऊन उष्णतेचा कहर पहायला मिळतोय. विकासाच्या गोंडस नावाखाली पर्यावरण-पुरकचे मापदंड विचारात घेतले जात नाहीत, म्हणून नैसर्गिक असमतोल झपाट्याने वाढताना दिसतो.यावेळी उपनगराध्यक्ष पठाण मोहम्मद हसन खान, सभापती श्रीराम नेम्मानीवार, नगरसेवक अभय महाजन, नगरसेवक प्रशांत कोरडे, सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस. एच. संघई, वनपाल एस .बी. दासरवार, वनपाल प्रकाश सूर्यवंशी, वनरक्षक सुनील खामकर, वनरक्षक सारिका माहुरे, वनरक्षक राऊबाई गीते यांची उपस्थिती होती.

## महिला कुस्तीपटू सविता कोमलवाड यांचे आकस्मिक निधन



हिमायतनगर/प्रतिनिधी-हिमायतनगर तालुक्यातील मुधळ येथील प्रसिद्ध महिला कुस्तीपटू सौ. सविता राम पाशमवार (कोमलवाड) यांचे अवघ्या २२ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने गोल्ला-गोलेवार यादव समाजासह क्रीडा क्षेत्रावर शोककळा पसरली असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सविताजी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत असतानाच कुस्तीच्या आखाड्यात पाऊल ठेवले होते. जिद्द, मेहनत आणि कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी महिला कुस्तीपटू म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. ग्रामीण भागातून पुढे येत त्यांनी कुस्ती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली होती. मुधळ येथील सविताजी यांचे माहेर शिबदरा येथील दत्ता कोमलवाड यांच्या कुटुंबात होते. अत्यंत कमी वयात त्यांनी संसारासोबतच क्रीडा क्षेत्रातही आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. त्यांच्या आकस्मिक निधनाच्या वृत्ताने नातेवाईक, मित्रपरिवार आणि कुस्तीप्रेमींना मोठा धक्का बसला आहे. सविताजी यांच्या पश्चात पती, अवघ्या दोन वर्षांचा मुलगा आणि केवळ चार महिन्यांची मुलगी असा परिवार आहे.

## कृषी,महसूल विभागाच्या किचकट प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांची अडचण

### दीड वर्षापासून सुद्धा पीएम किसान सन्मान निधी नाही

देगलूर/प्रतिनिधी-अनेक महिन्यापासून पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या पोर्टलवरील तांत्रिक अडचणी आणि संबंधित प्रक्रिया ठप्प असल्याने देगलूर तालुक्यातील हाणेगाव, मरखेल, लोणी, मानूर, माळेगाव, शहापूर आधी तालुक्यातील हजारो शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित आहेत.

पीएम किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. मात्र आधार प्रमाणीकरण, ई-केवायसी, बँक खाते, जमिनीच्या नोंदी, कृषी नोंदणी आणि वारस नोंदीसह विविध बाबींची पूर्तता करताना शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. कागदपत्रे व आवश्यक्य प्रक्रिया पूर्ण करूनही काही शेतकऱ्यांच्या खात्यावर लाभाची रक्कम जमा होत नसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. काही प्रकरणांमध्ये जमिनीच्या नोंदीतील तफावत, नावातील चुका, आधार क्रमांक किंवा बँक खात्याशी संबंधित त्रुटी तसेच वारस नोंद प्रलंबित असल्यामुळे लाभ अडकत असल्याचे सांगण्यात येते. विशेषता; वयोवृद्ध आणि ऑनलाईन प्रक्रियेची माहिती नसलेल्या शेतकऱ्यांना या प्रक्रियेसाठी कृषी कार्यालय, महसूल विभाग आणि बँकांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. एकीकडे खरीप हंगामातील शेतीची कामे सुरू असताना कागदपत्रांच्या पूरस्थितीसाठी वेळ आणि पैसा खर्च होत असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. एका कार्यालयातील तृप्ती दूर केल्यानंतर दुसऱ्या कार्यालयात नवीन अडचण समोर येत असल्याचीही शेतकऱ्यांची तक्रार आहे. पीएम किसान योजनेपासून वंचित शेतकऱ्यांची गाव निहाय यादी तयार करून गाव पातळीवर विशेष शिबिरे घ्यावीत. कृषी, महसूल आणि बँक प्रशासनाने संयुक्तपणे मोहीम राबवून ई-केवायसी, आधार प्रमाणीकरण, बँक खाते व जमिनीच्या नोंदीतील त्रुटी दूर कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. तांत्रिक किंवा कागदपत्रातील किरकोळ त्रुटीमुळे पात्र शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नयेत. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रलंबित लाभ पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

### मुंबईत दरड कोसळली...

ठरले आहे. परिसरातील अरुंद गल्ल्यांमुळे जेसीबीसह मोठी यंत्रसामग्री घटना स्थळापर्यंत पोहोचविण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे अग्निशमन दल आणि एनडीआरएफच्या जवानांना मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचा वापर करून ढिगारा हटवावा लागत आहे. दुर्घटनेला नऊ तास उलटूनही बचावकार्य सुरूच असून, ढिगाऱ्याखाली आणखी नागरिक अडकले असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, महापौर रितू तावडे यांनी घटनास्थळी सुरू असलेल्या बचावकार्याची माहिती देताना परिसरातील भौगोलिक परिस्थितीमुळे मदतकार्यात अडथळे येत असल्याचे सांगितले. गल्ल्या अत्यंत चिंचोळ्या असल्याने मोठी यंत्रसामग्री थेट घटनास्थळी नेता येत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे बचाव पथकांना हाताने ढिगारा हटवावा लागत असून, बचावकार्य पूर्ण होण्यासाठी आणखी काही तास लागू शकतात, असे त्यांनी सांगितले. हा परिसर अतिधोकादायक म्हणून घोषित करण्यात आला होता. प्रशासनाने यापूर्वीच रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्याच्या नोटिसा बजावल्या होत्या. मात्र, नागरिकांनी त्या नोटिसांचे पालन न केल्याने दुर्घटना घडल्याचे महापौरांनी सांगितले. या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करताना मृतांच्या नातेवाईकांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रत्येकी तीन लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आल्याची माहितीही महापौर रितू तावडे यांनी दिली. दरम्यान, बचावकार्य सुरू असलेल्या परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली असून, ढिगाऱ्याखाली आणखी कोणी अडकले आहे का, याचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांकडून कसून प्रयत्न सुरू आहेत.

### निवडणूक आयोगाची भूमिका...

आयोगाला विशिष्ट निष्कर्षापर्यंत पोहोचायचे होते. त्यामुळे २०१८ च्या पक्षघटनेकडे दुर्लक्ष करून आधी निष्कर्ष निश्चित करण्यात आला आणि त्यानुसार तर्क मांडण्यात आला, असा गंभीर आरोप सिब्बल यांनी केला. त्यामुळे लिखित पुरावे आणि आयोगाची भूमिका यांच्यातील कथित विसंगती आता सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीच्या केंद्रस्थानी आली आहे.

### विद्यार्थी आंदोलनावरुन...

सरकारची तयारी स्पष्ट केली आहे. मी संसदेत कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास तयार आहे. सरकारकडे लपवण्यासारखे काहीही नाही, असे शाह म्हणाले. प्रश्नोत्तराचा तास स्थगित करूनही चर्चा करण्याची तयारी असल्याचे सांगत शाह यांनी विरोधकांना चर्चेचे खुले आव्हान दिले. मी स्वतः सभागृहात बसेन, सर्वांचे ऐकेन आणि प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देईन. आता विरोधकांनी ठरवायचे आहे की चर्चा करायची की गोंधळ घालायचा, असे त्यांनी स्पष्ट केले.

**लेक्चर नको उत्तरे द्या-राहुल गांधी**

अमित शाह यांच्या या भूमिकेवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तीव्र शब्दांत पलटवार केला. गेल्या २० दिवसांपासून अमित शाह बेपत्ता आहेत. भारताच्या गृहमंत्र्यांमध्ये हिंमत नाही; ते सभागृहात येऊ शकत नाहीत, असा आरोप त्यांनी केला.विद्यार्थ्यांवरील कथित गोळीबार आणि लाठीमाराचा मुद्दा उपस्थित करत राहुल गांधी यांनी थेट शाह यांना सवाल केला.

विद्यार्थ्यांवर गोळ्या कोणी चालवल्या? खिळे लावलेल्या लाठ्यांनी विद्यार्थ्यांना मारहाण करण्याचे आदेश कोणी दिले? जर हे आदेश अमित शाह यांनी दिले असतील, तर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे, असे राहुल गांधी म्हणाले. शाह यांनी मात्र सरकार चर्चेपासून पळ काढत नसल्याचे स्पष्ट केले. तर राहुल गांधी यांनी सरकारने विद्यार्थी आंदोलनातील गंभीर प्रश्नांना थेट उत्तरे द्यावीत, अशी भूमिका घेतली. त्यामुळे संसदेत बेपत्ता कोण? आणि चर्चेपासून दूर कोण? यावरून दोन्ही बाजूंमध्ये राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४